Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 460 – 463
DOI: 10.5281/zenodo.10135040

Original Research Article

# महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्य

प्रा. अनिल चोखोबा जोंधळे

लोकप्रशासन विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: anil.jondhale1978@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील असामान्य नेते होते. त्यांनी अहिंसा या तत्त्वाचा स्विकार करून शांततेच्या मार्गाने ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा दिला. त्यांनी सविनय कायदेभंगाचा वापर करून दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह, सेवाग्रामद्वारे देशव्यापी संघटनेची स्थापना केली. चरखासंघ, सुतकताई, ग्रामसफाई , ग्रामीण विकास इत्यादी रचनात्मक कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले. याबरोबरच महात्मा गांधीजींनी 'ग्रामस्वराज्य' हि महत्वपूर्ण संकल्पना मांडली. भारत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाला पाहिजे यासाठी अनेक थोर नेत्यांनी व समाज सुधारकांनी प्रयत्न केले. महात्मा गांधीजींच्या विचारावर टॉलस्टॉय थोरो, रस्किन या विचारवंताचा प्रभाव होता. भारतातील गरिबी व बेरोजगारी या मुख्य समस्यांची गांधीजींना जाणीव होती. गरिबी व बेकारी नष्ट व्हावी यासाठी त्यांनी विदेशी कापडावर बहिष्कार आणि होळी केली. तसेच स्वदेशीचा पुरस्कार करून चरख्यावर सूत कातून विणलेल्या खादीच्या कापडाला त्यांनी प्रतिष्ठाही मिळवून दिली.भारत हा खेड्यांचा देश आहे, खेड्यांकडे चला हा उपदेशही गांधीजींनी केला. भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी 'खेडे'हा घटक केंद्रस्थानी मानून खेडी स्वावलंबी व स्वयंपूर्ण कशी होतील या दिशेने प्रयत्न करणे म्हणजेच गांधीजींचे ग्रामस्वराज्य होय. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची अशी कल्पना होती कि जिथे स्वावलंबी समाज असेल तो आपल्या उपजीविकेसाठी इतरांवर विसंबून राहणार नाही तर तो परस्परांच्या सहकार्याने गावगाडा चालवेल.

उद्योगांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. खेडी हा विकासाचं केंद्रबिंदू असला पाहिजे. जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत भारताचा विकास होणार नाही अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या भारत भ्रमणातून त्यांनी केलेले खेड्यांचे निरीक्षण, त्यांना आलेले अनुभव, खेड्यांमध्ये केलेले कार्य आणि त्यातून प्राप्त झालेले ज्ञान यातूनच त्यांची ग्रामस्वराज्य

संकल्पना अस्तित्वात आली. खेड्यांची समस्यांतून मुक्तता कारणे, आदर्श गावांची उभारणी करणे आणि ग्रामीण जनतेच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करणे हे गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेत अपेक्षित होते.

**ग्रामस्वराज्याचे घटक**

महात्मा गांधीजींच्या मते खेड्यात राहणाऱ्यांना उपजीविकेची साधने खेड्यात उपलब्ध करून दिल्यास ती शहरात येणार नाहीत. ग्रामस्वराज्यात खेड्यांना मुख्य प्रवाहात आणून आत्मनिर्भर अशी अर्थव्यवस्था निर्माण करून त्यांना निदान सामान्यप्रतीचे जीवन जगता यावे असा विचार ग्रामस्वराज्य संकल्पनेमागे गांधीजींचा होता. त्यासाठी गांधीजींनी रचनात्मक कार्यक्रमाची आखणी केली होती. ग्रामस्वच्छता, अस्पृश्यता निवारण, श्रमप्रतिष्ठा, सहकारी शेती, जातीय ऐक्य, दारूबंदी,ग्रामोद्योग, शिक्षण, आरोग्य, आर्थिक समानता,इत्यादी बाबींचा रचनात्मक कार्यक्रमात समावेश होता. गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेतील घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१. खेडी किंवा ग्राम**

ग्रामस्वराज्यात खेडे किंवा गाव हा सर्वात प्रमुख व महत्वपूर्ण घटक होता. प्रत्येक खेड्यांसाठी एक पंचायत असेल. ग्रामपंचायत हि गावाचा कारभार सांभाळेल. खेड्यातील प्रत्येक व्यक्ती हि स्वावलंबी असेल. व्यक्ती हा केंद्रबिंदू असून एकमेकांना सहाय्य करतील. सत्तेच्या विकेंद्रीकरणावर गांधीजींचा विश्वास होता.

**२. कार्याला महत्व**

कार्य किंवा काम कोणतेही असो ती सर्व कामे गावासाठी आवश्यक आहेत. प्रत्येक व्यक्तीने आपला चरितार्थ भागविण्यासाठी काम करणे आवश्यक आहे. काम कोणत्याही प्रकारचे असो त्या कामाला समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. महात्मा गांधीजींनी श्रम सिद्धांताचा स्वीकार करून शारीरिक कामाला प्रतिष्ठा व महत्व मिळवून दिले आहे. त्यांच्या मते त्यांचे आरोग्य चांगले राहते व त्याला समाधान देखिल मिळते.

**३. विकेंद्रीकरण**

महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्यात आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरणावर भर दिला आहे. ग्रामपंचायतीचे प्रशासन अधिकाधिक स्वयंपूर्ण असायला पाहिजे. राजकीय सत्ता हि साध्य नाही तर साधन आहे असे गांधीजींचे मत होते. त्यांनी राजकीय विकेंद्रीकारणांबरोबरच आर्थिक विकेंद्रीकरणालाही महत्व दिले. आथिर्क केंद्रीकरणामुळे समाजात विषमता निर्माण होते म्हणूनच उद्योगांच्या केंद्रीकरणाला गांधीजींनी विरोध केला होता.

**४. ग्रामोद्योगांना प्राधान्य**

ग्राम उद्योग हे ग्रामीण भागातील दारिद्रय व बेकारी नष्ट करतात. म्हणून ग्रामीण भागात कुटीरउद्योग व लघुउद्योगांना चालना मिळाली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण होण्यासाठी त्यांनी उद्योगांना प्राधान्य दिले आहे. चरखा हा ग्रामउद्योगातील केंद्र बिंदू आहे. हस्तव्यवसायाच्या केंद्रस्थानी चरखा असला पाहिजे शेतीतील कामे करत असतांना घरीच कापसापासून सूत कातून कापड विणून खादी तयार होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी रिकामा वेळ या कार्यात घालवावा. त्यामुळे अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होण्यास मदत मिळेल असे गांधीजींचे मत आहे.

### ५. अस्पृश्यता हा कलंक

महात्मा गांधीजींनी अस्पृश्यतेला भारतीय समाजावरील कलंक म्हटले आहे. त्यांना स्वराज्यापेक्षाही अस्पृश्यता निवारण करणे गरजेचे वाटत होते. ग्रामस्वराज्य निर्मितीसाठी अस्पृश्यता निवारण करणे आवश्यक आहे. अस्पृश्यता हि देशाला घातक असल्यामुळे भारतीय समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. यासाठी प्रत्येकाने अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच अस्पृश्यतेचा कलंक धुतला जाईल व भारतीय समाज प्रगती करेल असे गांधीजींचे मत आहे. म्हणूनच त्यांनी शेवटपर्यंत अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

### ६. सहकारी तत्वावर शेती

ग्रामीण भागातील खेड्यांमध्ये सहकारी तत्वावर शेती केली तर समाजात एकात्मतेची भावना निर्माण होईल. एकमेकांच्या सहकार्यामुळे भारत अधिकच मजबूत होईल असे गांधीजींनी स्वप्न पाहिले होते. सहकारी शेती या तत्वामुळे गरीब शेतकरी व ज्यांच्याकडे शेती करण्याचे साधन नाही त्याला सहकार्य होईल. या तत्वामुळे देशातील सहकार क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल.

### ७. ग्रामीण अर्थव्यवस्था

ग्रामीण अर्थव्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करता येईल. या मूलभूत गरजांच्या उत्पादनाची साधने सर्वसामान्य जनतेच्या हातात असावीत. उत्पादनाचे वितरण योग्य प्रकारे झाले पाहिजे. अन्नधान्याची व कापसाची निर्मिती करणे हे प्रत्येक गावाचे प्रथम कर्तव्य असावे. गावात पुरेसे अन्नधान्य, फळे, भाजीपाला आणि खादी यांचे उपलब्ध संसाधनाच्या जोरावर वस्तूंची निर्मिती करून आपल्या गरजांची पुर्तता करावी. अतिरिक्त मालाचा शहरात पुरवठा करावा. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल.

### ८. शिक्षण व्यवस्था

महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे असे म्हटले आहे. अहिंसावादी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देश्याने शिक्षण देण्यात यावे. शिक्षण हे मातृभाषेतून देण्यात यावे. हस्तउद्योगांचे शास्त्रीय पद्धतीने शिक्षण देण्यात यावे. शिक्षणात विश्वकुटुंब संकल्पनेला प्राधान्य देण्यात यावे. शारीरिक श्रमाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे. व्यावसायिक शिक्षणावर अधिक भर द्यावा. महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्य निर्मितीसाठी वर्गातील बंदिस्त शिक्षणापेक्षा कृतीवर आधारित शिक्षणावर भर देण्यास सांगितले.

### निष्कर्ष

महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्यामध्ये व्यक्तीच्या श्रमाला प्रतिष्ठा देण्यात आली आहे. भारत हा खेड्यांचा देश असून जोपर्यंत खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना हि आदर्श तत्वावर आधारित आहे, सत्तेच्या विकेंद्रीकरणावर दिलेला भर, दारूबंदी करणे काळाची गरज तसेच ग्रामपंचायतीचे व ग्रामसभेचे वाढते महत्व पाहून गांधीजींचे विचार सद्यस्थितीत किती महत्वाचे आहेत हे दिसून येते. ग्रामस्वराज्याची संकल्पना नैतिकतेच्या दृष्टीकोनातून मांडलेली असली तरी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यकता असल्याचे दिसते. ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून खेड्यातील राजकीय, आर्थिक, शैक्षणिक विकास झाला पाहिजे तसेच ग्रामीण भागातील घटकांचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे यासाठी त्यांनी स्वच्छतेवर भर दिला आहे. थोडक्यात ग्रामीण भागातील लोकांचा विकास साधण्यासाठी आजच्या परिस्थितीतसुद्धा ग्रामस्वराज्याची संकल्पना उपयुक्त असल्याची दिसून येते.

**संदर्भ सूची**


1. डॉ. सुरेंद्र कटारिया, पंचायराज्य संस्थाएँ, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर, २००७
2. रॉय किणीकर संपादक, गांधी नावाचे महात्मा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१४
3. डॉ. पद्मावती,ग्रामीण निर्धनता, तिवारी पब्लिकेशन्स, दिल्ली,१९९१
4. प्रा. कोत्तापल्ले, पाश्चिमात्य व भारतीय विचारवंत, कल्पना प्रशासन,नांदेड,१९९९
5. मिश्र अनिल, गांधी के विचार, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली,२००९
6. धर्माधिकारी, भाऊ (संपादक), ग्रामस्वराज्य, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधी भवन,कोथरूड, पुणे,१९९५